'A' प्रमाणे कार्यवाहीसाव
न.लि.
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक,नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 276 दिनांक- 14.02.25
संबंधित अधि./कर्म.
उ.स.न.र.

**मंजुर विकास योजना, भुसावळ, जि. जळगाव**
मौजे कंडारी, ता. भुसावळ जि. जळगाव स.नं. १९१/१३अ/१९१/१ब या जमिनीवरील आ. क्र. ११७ "वाहनतळ" हे आरक्षण व्यपगत झाल्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये आदेश निर्गमित करणेबाबत.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये,**
**पुणे - ४११ ००१**

**निर्णय**: जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. भुसावळ (दु.सु)/आ.क्र.११७ /कलम-१२७(२)/ आदेश / प्र.क्र. ९५८ /टिपीव्ही-४/ ७७० **दिनांक** :-१३.०२.२०२५.

सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी) भाषेत महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

(दे.व्यं. चावरे)
कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-४,
मुख्य कार्यालय, पुणे.

प्रति,

मा. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** या कार्यालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक आणि सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव सादर** :-

१.मा. अप्पर मुख्य सचिव (१),महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग(नवि-९),मंत्रालय, मुंबई-३२.

२.मा. सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.

३.मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

४.मा. जिल्हाधिकारी, जळगाव.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

५. मा. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्या संबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावेत. तसेच सदर आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. मा. सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव.

/-प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **सहा** प्रती संचालनालयास विहीत मार्गाने त्वरीत सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, भुसावळ नगर परिषद, ता. भुसावळ, जि. जळगाव.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. श्री. सदाशिव किसन भारंबे व इतर, रा. कंडारी, ता. भुसावळ, जि. जळगाव.

Government of Maharashtra

**Town Planning and Valuation Department**
**Directorate Of Town Planning**
**Ground floor, Central Building, Pune 411 001**

**Telephone No. 020-26122076** **Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in**

---

# ORDER

No. D.T.P/D.P.Bhusawal(II R) / Site No. 64/Sec-127(2)/ Order/C.No. 958 /
TPV-IV/ 770 Date :-13 .02.2025.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Second Revised Development Plan of Bhusawal Municipal Council has been sanctioned under the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government of Maharashtra in Urban Development Department vide its Notification No. TPS-3505/644/CR-65(B)/ UD-9, dated 21.11.2005 (hereinafter referred to as "**the said Notification**") and the same has come into force with effect from 15.01.2006; (hereinafter referred to as "**the said sanctioned Development Plan**");

And whereas, in the said sanctioned Development Plan, an area admeasuring approximately 3000 Sq.m. of the land bearing S.No.191 part of Mouza Kandari, Tal- Bhusawal, Dist. Jalgaon is reserved for Reservation namely Site No. 117 – "Parking" (hereinafter referred to as "**the said Reservations**"); for which Appropriate Authority is Municipal Council, Bhusawal (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**");

And whereas, the land under the said reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said sanctioned Development Plan came into force;

And whereas, the owner of the land (hereinafter referred to as "**the said land owner**") under the said Reservation in respect of area admeasuring 3398 sq.m. of land bearing S.No. 191/1A/191/1B of Mouze Kandari (hereinafter referred to as "**the said Land**") had served a Notice dated 11.03.2022 under the provisions of section 127(1) of the the said Act (hereinafter referred to as "**the**



ASP

**said Notice**"), on the said Appropriate Authority, which was received by the said Appropriate Authority on 11.03.2022;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Bhusawal has communicated that, 'the said land under the said Reservation is not acquired or no steps as required under the provisions of Section 127(1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period of two years after the date of service of the said Notice';

And whereas, the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch, Jalgaon and Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik has communicated their no objection remarks, that as per measurement plan a total area of 2699 sq.m. of the suit land is affected by the said reservation and accordingly, it would be appropriate to pass an order as per the provisions of section 127(2) of the said Act;

And whereas, a meeting has been held on 09.01.2025 with the Director of Town Planning, Maharashtra State, Pune to clarify the matter;

And whereas, in accordance with the provisions of section 127(1) of the said Act, the said Reservation on the said Land has lapsed, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department under the provisions of Section 151 of the said Act, vide Resolution No.TPS -1813 /3211 /CR – 508/UD -13, dated 01.12.2016, has delegated the powers exercisable by it to take action under the provisions of Section 127(2) of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat / Zilla Parishad as a Planning Authority;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect of the said Land under the provisions of section 127(2) of the said Act and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as follows:-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

<u>**SCHEDULE**</u>

| Sr. No. | Municipal Council, Mouja, Tal, Dist. | Reservation of the said sanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said Land under the said Notice | Approximate Area lapsed from the said Reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | Bhusawal Municipal Council, Mouja Kandari, Tal. Bhusawal, Dist. Jalgaon | Site No.64 – "Parking", (Area 3000 Sq. m.) | S.No. 191/1A/191/1B | 2699 Sq.m. |

**Note :-**

1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Bhusawal, Dist. Jalgaon during office hours on all working days for inspection to public up to one month.

3) This Order shall also be published on the Directorate's official website **<u>www.dtp.maharashtra.gov.in .</u>**

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT DIRECTOR OF TOWN PLANNING M.S. PUNE

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे,४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

## आदेश

जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. भुसावळ (दु.सु.)/आ.क्र. ११७/कलम-१२७(२)/आदेश / प्र.क्र.९५८/टिपीव्ही-४/ ७७० दि.१३.०२.२०२५.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

ज्याअर्थी, भुसावळ नगरपरिषदेची व्दितीय सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे **"उक्त अधिनियम"** असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-३५०५/६४४/प्र. क्र. ६५(बी) / नवि-९, दि.२१.११.२००५ (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे) अन्वये मंजूर केली असून, ती दि.१५.०१.२००६ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौजा कंडारी, ता. भुसावळ, जि. जळगांव येथील स. नं. स.नं. १९१ पै. या जमिनीचे अंदाजे ३००० चौ. मी. क्षेत्र आरक्षण क्र. ११७, "वहानतळ" (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिले आहे.) यासाठी आरक्षित करण्यात आले असून, त्यासाठी समूचित प्राधिकरण हे नगरपरिषद, भुसावळ आहे (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासुन १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा भुसावळ येथील स. नं. स.नं. १९१/१अ /१९१/१ब या जमिनीचे ३३९८ चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे **"उक्त जमीन"** असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या मालकाने (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिले आहे) दि.११.०३.२०२२ रोजी उक्त समूचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे

तरतुदीन्वये सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दि.११.०३.२०२२ रोजी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, भुसावळ यांनी, 'उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित दोन वर्षाच्या मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ', असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव व सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी मोजणी नकाशाप्रमाणे उक्त आरक्षणाने उक्त जमिनीचे २६९९ चौ. मी. क्षेत्र बाधित होत असल्याचे नमुद करून उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) चे तरतूदीन्वयेचे आदेश निर्गमित करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सर्व संबंधितांची दि.०९.०१.२०२५ रोजी बैठक घेऊन प्रकरणाची स्पष्टता करून घेण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (१) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उपकलम (२) चे तरतुदीनुसार, उक्त जमीन मालकाच्या उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३२११/ प्र. क्र. ५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या नगरपरिषदा / नगर पंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाली आहेत, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत:-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे:-

## परिशिष्ट

| अ.क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशिल | व्यपगत झालेल्या आरक्षणाचे अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | भुसावळ नगर परिषद, मौजा कंडारी, ता. भुसावळ , जि. जळगांव. | आ. क्र. ११७- "वाहनतळ" (क्षेत्र ३००० चौ. मी.) | स. नं. १९१/१अ/१९१/१ब | २६९९ चौ.मी. |

टिप :-

१) उक्त आरक्षणांतून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमिनमालकास उपलब्ध होईल.

२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, भुसावळ नगरपरिषद, भुसावळ, जिल्हा जळगांव यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३) सदर आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा.पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.